# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

Web portal : hinduprakashwarta.com

छत्रपती संभाजीनगर ❀ शनिवार, दि. ११ जुलै २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ८१ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


## शर्तभंग झालेल्या जमिनी सरकार जमा करणार

**मुंबई :** राज्यातील सिडको, नैना, एमएमआरडीए(MMRDA) तसेच विविध नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या अखत्यारीत असलेल्या, परंतु अटी व शर्तींचे उल्लंघन (शर्तभंग) झालेल्या शासकीय जमिनी विशेष मोहीम राबवून तातडीने शासनाने स्वतःच्या ताब्यात घ्याव्यात, असे आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. राज्यातील सर्व वर्ग-२ च्या जमिनींची सखोल माहिती घेण्याचे निर्देशही त्यांनी शुक्रवारी उच्चस्तरीय बैठकीत दिले.


## पाहिजेत

श्री VARAD CONSTRUCTION

श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी संभाजीनगर येथे 3 वर्ष अनुभव असलेल्या सिव्हिल इंजिनिअर च्या जागा भरणे आहे.इच्छुक उमेदवार यांनी ईमेल आयडी नंबर shrivaradconstructionco@gmail.comवर आपले अर्ज पाठवावे किंवा मोबाईल नंबर 9923104521/9226611011वर संपर्क साधावा.

कार्यालय : श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी, नंबर 515,5वा माळा, वास्तू इलाईट स्क्वेअर बीड बायपास रोड छत्रपती संभाजी नगर येथे कार्यालयीन वेळेत समक्षात भेटावे.


## थोडक्यात वार्ता

### आता खिशाला परवडणार, 39 महागडी औषधांच्या किमती नियंत्रित

**नवी दिल्ली :** सर्वसामान्य रुग्णांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. 'नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग ऑथॉरिटी'ने ३९ जीवनरक्षक औषधांच्या कमाल किरकोळ किमती निश्चित केल्या आहेत. हृदयविकार, मधुमेह, उच्च रक्तदाब, कर्करोग, एचआयव्ही आणि जिवाणूजन्य संसर्गासारख्या गंभीर आजारांवरील औषधांचा यात समावेश असल्याने, यामुळे रुग्णांवरील उपचारांचा आर्थिक भार लक्षणीयरीत्या कमी होणार आहे. 'ड्रग्ज(Durgs) (प्राइस कंट्रोल) ऑर्डर, २०१३' अंतर्गत केंद्रीय रसायन आणि खत मंत्रालयाने या दरांची घोषणा केली आहे. हे दर वस्तू आणि सेवा कर वगळून लागू करण्यात आले आहेत. एनपीपीएने स्पष्ट केले आहे की, आता कोणत्याही उत्पादक कंपनीला या निश्चित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त दराने औषधांची विक्री करता येणार नाही.

प्रमुख औषधे आणि त्यांचे नवीन दर

या यादीत अनेक महागड्या औषधांचा समावेश आहे. हृदयविकाराच्या उपचारात वापरल्या जाणाऱ्या 'टेनेक्टेप्लेस' इंजेक्शनची किंमत ६०,२३८.२७ रुपये प्रति व्हायल निश्चित करण्यात आली आहे. अम्लोडिपिन आणि टेल्मिसार्टन गोळ्यांची किंमत प्रति गोळी १२.०३ रुपये, तर ॲस्पिरिन आणि अटोरवास्टॅटिन कॅप्सूलची किंमत ३.६७ रुपये प्रति कॅप्सूल असेल. याशिवाय, मधुमेहाच्या रुग्णांसाठी लागणारी ग्लिमेपिराइड, वोग्लिबोस आणि मेटफॉर्मिन औषधे ८.८५ रुपये प्रति गोळी या दराने मिळणार आहेत. एचआयव्ही उपचारासाठीच्या कॉम्बिनेशन किटची किंमत ३३०.४० रुपये निश्चित करण्यात आली आहे.

### राष्ट्रगीत गायनासंदर्भात नवीन नियमावलीच योग्य क्रम

**नवी दिल्ली :** केंद्रीत गृह मंत्रालयाने राष्ट्रगीत आणि राष्ट्रगान गायनासंदर्भात सर्व राज्य सरकारे, केंद्रशासित प्रदेश आणि केंद्रीय मंत्रालयांना नवीन व कडक मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. या नव्या निर्देशांनुसार, राष्ट्रगीत आणि राष्ट्रगान गाताना किंवा वाजवताना त्यांचे नियम, योग्य क्रम, अचूक शब्द आणि स्पष्ट उच्चार यांचे काटेकोरपणे पालन करणे अनिवार्य करण्यात आले आहे.गृह मंत्रालयाने ९ जुलै २०२६ रोजी सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना आणि केंद्र सरकारच्या विविध विभागांच्या सचिवांना पत्र लिहून या आदेशांची कडक अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. या नवीन नियमांनुसार, ज्या कार्यक्रमांमध्ये राष्ट्रगीत आणि राष्ट्रगान हे दोन्ही सादर केले जाणार आहेत, तिथे एक निश्चित क्रम पाळणे आवश्यक आहे.

### एटीएसने विदर्भातून दहा जणांना घेतले ताब्यात

**नागपूर :** महाराष्ट्र पोलिसांच्या दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) आज, शुक्रवारी राज्यभर केलेल्या कारवाईंतर्गत विदर्भातून 10 संशयितांना ताब्यात घेतले आहे. यात नागपुरातून 4, चंद्रपूर येथून 3 आणि गडचिरोली, गोंदिया व वर्धा येथून प्रत्येकी एक असे एकूण 10 जणांचा समावेश आहे. कुख्यात पाकिस्तानी गँगस्टर शहजाद भट्टीशी सोशल मिडीयाच्या माध्यमातून संपर्क असल्याच्या संशयावरून ही कारवाई करण्यात आलीय. कारवाईदरम्यान एटीएसने संशयितांचे मोबाईल फोन जप्त केले असून, त्यांच्या सोशल मीडिया अकाउंट्स, व्हॉट्सअॅप आणि इन्स्टाग्रामवरील चॅट, कॉल डिटेल रेकॉर्ड (सीडीआर) तसेच इतर डिजिटल पुराव्यांची फॉरेन्सिक तपासणी सुरू केली आहे. पाकिस्तानातून कोणत्याही प्रकारचे निर्देश देण्यात आले होते का, तसेच संबंधित व्यक्तींशी थेट किंवा अप्रत्यक्ष संपर्क प्रस्थापित करण्यात आला होता का, याचा तपास यंत्रणा सखोलपणे करत आहेत.

# 2019 मधील लाभधारक शेतकऱ्यांनाही सरसकट कर्जमाफी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा; आक्षेप घेणाऱ्यांना संबोधले 'सुपारीबाज'

**मुंबई :** राज्यातील बळीराजाला आतापर्यंतची सर्वात मोठी कर्जमाफी देणाऱ्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजने'ची व्याप्ती वाढवत, २०१९ मधील 'महात्मा जोतिबा फुले कर्जमाफी योजने'च्या सुमारे २ लाख लाभधारक शेतकऱ्यांनाही सरसकट २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विधानसभेत केली. याशिवाय योजनेतील २६-२७ चा नियमही वगळण्यात येणार असल्याने राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना तब्बल ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ मिळणार आहे. अंतिम आठवडा प्रस्तावावरील विरोधकांच्या टीकेला उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी राज्यातील शेतकरी हिताला प्राधान्य देत असल्याचे अधोरेखित केले, तर दुसरीकडे पायाभूत सुविधांच्या कामांवरून खोट्या बातम्या पसरवून 'मिसिंग लिंक'च्या पुलाबाबत चिखलफेक करणाऱ्या विरोधकांना 'सुपारीबाज' आणि 'भाटक गदर्भ' (भाडोत्री गाढव) म्हणत प्रतिटोला लगावला.

विधानसभेत 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजने'वर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस(Devendra Fadnavis) यांनी विरोधकांचे सर्व आरोप आकडेवारीनिशी खोडून काढले. ते म्हणाले, "या योजनेतून केवळ १२ हजार कोटींचाच लाभ मिळेल आणि ३६ लाख शेतकऱ्यांवर अन्याय होईल, हा विरोधकांचा दावा पूर्णपणे खोटा आहे. ही योजना ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचे कवच देणारी आतापर्यंतच्या इतिहासातील सर्वात मोठी कर्जमाफी आहे. मविआच्या काळात महात्मा जोतिबा फुले कर्जमाफी योजनेत २ लाखांपेक्षा एक रुपया जरी जास्त थकबाकी असली तरी शेतकऱ्यांना लाभ मिळाला नाही. मात्र, आमच्या सरकारने २ लाखांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनाही या योजनेत सामावून घेऊन २ लाखांपर्यंतची कर्जमाफी दिली आहे", असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेत, महात्मा फुले कर्जमाफी योजनेतील लाभधारकांना आधी ५० हजारांचा लाभ देण्याचे निश्चित झाले होते. मात्र, आमदार रणधीर सावरकर(Randhir savarkar) यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन जनभावना मांडली. त्या पार्श्वभूमीवर, जनभावनेचा आदर करत २०१९ मधील या २ लाख शेतकऱ्यांनाही सरसकट २ लाखांपर्यंत कर्जमाफी देण्याचा मोठा निर्णय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केला. यासोबतच दरवर्षी २५ हजार कोटी रुपयांची वीज बिल माफी देखील महायुती सरकार शेतकऱ्यांना देत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# 'तारीख पे तारीख'... पण संभाजीनगरकरांना पाणी कधी?; विधान परिषदेत सरकारला जाब

## रखडलेल्या पाणीपुरवठा योजनेवर अंबादास दानवेंचा हल्लाबोल



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगरच्या बहुप्रतीक्षित पाणीपुरवठा योजनेच्या रखडलेल्या कामाचा मुद्दा शुक्रवारी विधान परिषदेत गाजला. शिवसेना आमदार अंबादास दानवे यांनी सरकारला धारेवर धरत, "तारीख पे तारीख दिली जाते; मात्र संभाजीनगरकरांच्या नळाला नियमित पाणी नेमके कधी येणार?" असा सवाल उपस्थित केला.

दानवे म्हणाले, २०५० पर्यंतच्या पाणी गरजा लक्षात घेऊन हाती घेतलेली योजना अनेक वर्षांपासून अपूर्ण आहे. मुख्यमंत्री, पालकमंत्री आणि प्रशासनाकडून वारंवार काम पूर्ण होण्याच्या घोषणा केल्या जात असल्या, तरी नागरिकांना अद्याप नियमित पाणी मिळालेले नाही. योजनेच्या कामात निविदेतील अटींचे उल्लंघन झाल्याचा आरोप करत अपेक्षित दर्जाऐवजी निकृष्ट साहित्य वापरल्याने भविष्यात गळती व तांत्रिक अडचणी निर्माण होऊ शकतात, अशी भीती त्यांनी व्यक्त केली.

कंत्राटदाराला आर्थिक सवलती व मुदतवाढ देऊनही काम पूर्ण झाले नसल्याचे सांगत संबंधित अधिकारी आणि कंत्राटदारांची जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली. महानगरपालिका, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि कंत्राटदार यांच्यातील समन्वयाअभावी प्रकल्प रखडल्याचाही मुद्दा त्यांनी उपस्थित केला.

### मंत्री उदय सामंत यांचे उत्तर

**नगरविकास मंत्री उदय सामंत यांनी सांगितले की, २००९ मध्ये सुरू झालेल्या या योजनेची किंमत ६६७ कोटी रुपयांवरून तांत्रिक बदलांमुळे २,७४० कोटी रुपयांपर्यंत वाढली आहे. प्रकल्पाचे उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू असून उच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली दर पंधरा दिवसांनी आढावा घेतला जात आहे. निविदेतील कंपनीऐवजी अन्य कंपनीचे साहित्य वापरल्याच्या आरोपांची चौकशी केली जाईल. तसेच स्वतंत्र समिती नेमून प्रकल्पाची तपासणी करून सर्व संबंधितांना सोबत घेत लवकरात लवकर नियमित पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी आवश्यक निर्णय घेतले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली.**

# दूध तापवताच दुधातून निर्माण झाले रबरा सारखा पदार्थ

## एफ डी ए व पोलिसाकडून चौकशी सुरू, खाजगी दूध विक्रेत्यावर कारवाईची बडगा

हिंदू प्रकाशवार्ता / अशोक पवार

परभणी आता कुठलीही वस्तू घेतली की त्यामध्ये भेसळ मिळणारच पूर्ण महाराष्ट्रातच भेसळयुक्त वस्तूने कहर केला आहे शुद्धतेचे प्रमाण केवळ नाममात्र दिसून येईल ग्रामीण भागातल्या दूध विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांकडे सकाळी भल्या पहाटे दूध वाल्याची वाट पाहतात व त्या दुधाचा चहा पिऊन मनाला प्रसन्नता जाणून घेतात पण त्या अमृततुल्य दुधाला भेसळीची झालर लागल्यामुळे रेती माफिया औषधी माफिया केमिकल माफिया खवा माफिया तसेच नव्याने दूध भेसळ माफियाची निर्मिती मोठ्या प्रमाणात झाली असून सर्वसामान्य गरीब जनतेचा प्रिय पदार्थ म्हणून चहाकडे बघितले जाते पण त्याच्या मध्ये चक्क विष मिसळण्याचं काम हे दूधवाले माफिया करत आहेत असाच एक धक्कादायक प्रकार पूर्णा शहरात उघडकीस आला .



ग्रामीण भागातील दूधवाले कडून दूध विकत घेऊन तें दूध तापवल्यानंतर रबर सदस्य पदार्थ निर्माण झाला हे रबरा सारखा पदार्थ पाहण्यासाठी लोकांची एकच झुंबड उडाली हे पाहून मोठी खळबळ उडाली असून या घटनेमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले असून संबंधित दूध विक्रेत्या विरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी समस्त नागरिकाकडून होत आहे अधिक माहिती अशी की पूर्ण शहरातील कोळीवाडा परिसरातील संतोष भंगे यांच्या मुलगा धारेश्वर भंगे यांनी बुधवार दिनांक 8 जुलै रोजी रात्री सुमारे नऊ वाजता सराफा बाजार परिसरातील स्टॉल लावून दूध विक्री करणारे गणेश भगवानराव बोबडे राहणार माटेगाव तालुका पूर्णा अर्धा लिटर दूध खरेदी केले दूध घरी आणल्यानंतर त्यांनी ते तापवण्यासाठी ठेवले थोड्याच वेळात रबरा सारख्या पदार्थामध्ये रूपांतर झाले दूध आटून खवा होण्याऐवजी रबर सदर्ष्य पदार्थ निर्माण झाल्याने भंगे कुटुंबीय घाबरले हा प्रकाराची चर्चा परिसरात पसरताच जे जे लोक त्या स्टॉल वरून दूध घेत होते त्यांचे ते धाबे दणाणले.

या घटनेचे प्रकाराची माहिती तात्काळ स्थानिक पोलीस तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाशी संपर्क साधून कळविण्यात आली माहिती मिळताच अन्न व औषध भेसळ निरीक्षक विश्वंभर ठोंबरे फौजदार अमर चाऊस आणि पोलीस कर्मचारी चंद्रकांत कुदलवार यांनी घटनास्थळी प्राथमिक चौकशी केली दरम्यान सदरील दूध विक्रेता गणेश भगवानराव बोबडे याला पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती असून पाठविण्याची प्रक्रिया सुरू आहे तपास अहवाल आल्यानंतर संबंधिताविरोधात अन्नसुरक्षा व मानके कायद्यानुसार तसेच गुन्हा दाखल होण्याची व्यक्त केली जात आहे पूर्ण शहरातील दूध विक्री च्या व्यवसायावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून खाजगी दूध विक्रेत्याकडून विकल्या जाणाऱ्या दुधाचे व्यापक तपासणी करून दोषीवर कठोर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांकडून आणि या प्रकरणात एफडीएच्या अहवालाकडे आणि पुढील कार्यवाहीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीशांवर आक्षेपार्ह टिप्पणी, न्यायमूर्तींसमोर गोंधळ

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयात सुनावणीदरम्यान एका वकिलाने न्यायालयीन शिष्टाचाराचे उल्लंघन करत न्यायमूर्तींसमोर अभूतपूर्व गोंधळ घातल्याची घटना घडली. सुनावणी सुरू असताना संबंधित वकिलाने न्यायमूर्तींनाच आदेश देण्याचा प्रयत्न केला, न्यायमूर्तींच्या दिशेने कागदपत्रे भिरकावली आणि सरन्यायाधीशांचा उल्लेख करत आक्षेपार्ह भाषा वापरल्याने न्यायालयात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रबल प्रताप नावाचा वकील स्वतःच्याच याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडत होता. ही याचिका इलाहाबाद उच्च न्यायालयाच्या एका निर्णयाविरोधात दाखल करण्यात आली होती. सुनावणी सुरू होताच संबंधित वकिलाने युक्तिवाद करण्याऐवजी थेट न्यायालयालाच आदेश देण्याची भूमिका घेतली. 'एसीपी, लखनऊ यांच्या विरोधात एफआयआर दाखल करण्याचे आदेश द्या,' असे म्हणत त्याने न्यायालयाशी असामान्य पद्धतीने संवाद साधण्याचा प्रयत्न केला.

या वक्तव्यानंतर खंडपीठावरील न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांनी, 'तुम्ही आम्हालाच आदेश देत आहात का?' असा प्रश्न दोन वेळा उपस्थित केला. मात्र, त्यानंतरही संबंधित वकिलाने आपली भूमिका न बदलता, 'माझ्याकडून एवढेच, सर्व काही रेकॉर्डवर आहे,' असे म्हणत हातातील कागदपत्रे न्यायमूर्तींच्या दिशेने भिरकावली. त्यानंतर त्याने सरन्यायाधीशांचा उल्लेख करत आक्षेपार्ह शब्दांचा वापर केल्याचे सांगण्यात आले. घटनेमुळे न्यायालयात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. त्यानंतर न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांनी संताप व्यक्त करत संबंधित वकिलाला तत्काळ न्यायालयाबाहेर काढण्याचे निर्देश दिले.

# मराठवाड्यात ATS ची मोठी कारवाई; पाकिस्तानातील गँगस्टरशी संपर्काचा संशय, 14 जण ताब्यात!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यात (शुक्रवारी) दहशतवादविरोधी पथकाने (ATS) अत्यंत गुप्त आणि मोठी कारवाई केल्याने संपूर्ण जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. पाकिस्तानमधील कुप्रसिद्ध गँगस्टर शहेजाद भट्टी याच्याशी सोशल मीडिया अकाउंट आणि ऑनलाइन माध्यमातून कथित संपर्क असल्याच्या संशयावरून एटीएसने १४ जणांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

मिळालेल्या खात्रीलायक सूत्रांच्या माहितीनुसार, शुक्रवारी सकाळी साधारण ८ वाजण्याच्या सुमारास छत्रपती संभाजीनगर येथील एटीएस (ATS) पथकाने ही धडक मोहीम राबवली. एकाच वेळी विविध ठिकाणी छापे टाकून एकूण १४ संशयितांना पुढील चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. या कारवाईमध्ये छत्रपती संभाजीनगरमधील ६ जणांसह जालना (अंबड, भोकरदन), बीड आणि धाराशिव या जिल्ह्यातील संशयितांचा समावेश आहे. हा संपर्क नेमका कधी आणि कसा सुरू झाला? दोन्हीं बाजूंनी नेमका काय संवाद झाला आणि त्याचे स्वरूप काय होते? या संपर्कामागे देशविघातक कारवायांचा काही कट होता का? या प्रकरणी तपास करत आहे. हे प्रकरण पूर्णपणे ऑनलाइन आणि सोशल मीडियाशी जोडलेले असल्याने एटीएस तांत्रिक तपासावर अधिक भर देत आहे. संशयितांचे मोबाईल फोन्स, सोशल मीडिया व्यवहार, चॅट्स आणि इतर सर्व डिजिटल उपकरणे जप्त करण्यात आली असून त्यांची सखोल पडताळणी सुरू आहे. या कारवाईचे गांभीर्य लक्षात घेता, तपास यंत्रणांनी अद्याप कोणतीही अधिकृत किंवा सविस्तर माहिती जाहीर केलेली नाही.

# फर्दापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेला आले तळ्याचे स्वरूप; गुडघाभर पाण्यातून वाट काढताना ग्राहकांचे अतोनात हाल

हिंदू प्रकाशवार्ता /शेख हक्कानी

**फर्दापूर प्रतिनिधी :** जगप्रसिद्ध अजिंठा लेणीच्या प्रवेशद्वारावर असलेल्या फर्दापूर गावा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या (DCC Bank) समोर पावसाचे पाणी साचून तळे निर्माण झाल्याने, ग्राहकांना आणि विशेषतः वयोवृद्ध शेतकऱ्यांना चिखलाच्या आणि गुडघाभर पाण्यातून जीव मुठीत धरून बँकेत जावे लागत आहे. प्रशासनाच्या या हलगर्जीपणामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

*बँकेच्या दारातच पाण्याचे साम्राज्य*





सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असून, थोड्याशा पावसातही फर्दापूरच्या महत्त्वाच्या इमारतींसमोर पाणी साचत आहे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या प्रवेशद्वारासमोर पाण्याचे मोठे डबके साचले आहे. बँकेत कामानिमित्त आलेल्या एका वयोवृद्ध ग्राहकाला कपडे वर करून या गुडघाभर गढूळ पाण्यातून वाट काढावी लागत आहे, तर काही नागरिक बँकेच्या पायऱ्यांवर अडकून पडले आहेत.

**शेतकरी आणि वयोवृद्धांची मोठी गैरसोय :**

जिल्हा मध्यवर्ती बँक ही परिसरातील शेतकऱ्यांची प्रमुख बँक आहे. पीक कर्ज, पेन्शन, पीक विमा आणि इतर शासकीय योजनांचे पैसे काढण्यासाठी शेतकरी, मजूर आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने येथे येतात. मात्र, बँकेत प्रवेश करण्यासाठीच असा जलमय आणि चिखलमय रस्ता पार

**-> पान 2 वर**

## "शाल जोडे"




# ग्रामीण पोलिसांनी जप्त केलेला 906 किलो गांजा कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून केला नष्ट

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** अंमली पदार्थांच्या अवैध व्यापाराला प्रभावी आळा घालण्यासाठी आणि तस्करांची साखळी मोडून काढण्यासाठी छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस दलाकडून सातत्याने कठोर पावले उचलली जात आहेत. याचाच एक भाग म्हणून जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यांतर्गत (NDPS Act) दाखल गुन्ह्यांमध्ये जप्त करण्यात आलेला तब्बल ९०६.६३ किलो गांजा हा अंमली पदार्थ सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून नष्ट करण्यात आला आहे. पोलिसांच्या या मोठ्या कारवाईमुळे जिल्ह्यातील अंमली पदार्थ तस्करांचे







धाबे दणाणले आहेत.ग्रामीण पोलीस दलाने सन २०२३ ते २०२६ या तीन वर्षांच्या कालावधीत जिल्ह्यातील वैजापूर, करमाड, पिशोर, शिवूर, फुलंब्री, सिल्लोड ग्रामीण आणि बिडकीन या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत विविध कारवाया केल्या होत्या. या गुन्ह्यांमध्ये जप्त करण्यात आलेली गांज्याची झाडे आणि सुका गांजा असा एकूण ९०६.६३ किलो मुद्देमाल पोलीस मुख्यालय, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथील अंमली पदार्थांच्या मध्यवर्ती गोडाऊनमध्ये सुरक्षित ठेवण्यात आला होता. हा जप्त केलेला मुद्देमाल नष्ट करण्यासाठी पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या अध्यक्षतेखाली अंमली पदार्थ नाश समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने संपूर्ण मुद्देमालाचा सविस्तर आढावा घेतला. सदर गांजा विल्हेवाट लावण्यापूर्वी आवश्यक असलेला रासायनिक विश्लेषण अहवाल मिळवणे, संबंधित मा. न्यायालयाची रीतसर परवानगी प्राप्त करणे आणि इतर सर्व आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक यांनी दिले होते. त्यानुसार सर्व प्रक्रिया नियमानुसार अत्यंत पारदर्शकपणे पूर्ण करण्यात आली.सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता झाल्यानंतर ८ जुलै २०२६ रोजी हा संपूर्ण ९०६.६३ किलो गांजा नष्ट करण्यासाठी पुण्याच्या शिरूर तालुक्यातील एमआयडीसी रांजणगाव येथील 'महाराष्ट्र एन्व्हीरो पॉवर लिमिटेड' येथे सुरक्षितरित्या पाठविण्यात आला. तेथे पर्यावरणीय तसेच कायदेशीर निकषांचे काटेकोर पालन करून या अंमली पदार्थाचा अंतिम नाश करण्यात आला. सदर कारवाई अंमली पदार्थ नाश समितीचे सदस्य अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी, प्रभारी पोलीस उपअधीक्षक संजय सहाणे, समितीचे नोडल अधिकारी तथा स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विजयसिंग राजपूत, तसेच प्रादेशिक न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेचे सहाय्यक रासायनिक विश्लेषक संतोष रानडे आणि वैज्ञानिक सहाय्यक धनेश इंगळे यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत व देखरेखीखाली पार पडली. अंमली पदार्थांच्या अवैध साखळीला खिळ बसविणे आणि समाजाला व्यसनमुक्त व सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे, हाच या कारवाईमागील मुख्य उद्देश असल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे. ही संपूर्ण कामगिरी पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव आणि अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली संजय सहाणे, विजयसिंग राजपूत, तसेच पोलीस अंमलदार संगीता वासडीकर, रवी लोखंडे, सचिन सोनार, प्रिया भंडारे आणि सरला जाधव यांनी यशस्वीपणे पार पाडली.

# सं पा द की य

## डॉक्टरांवरील हल्ले आणि प्रशासकीय असंवेदनशीलता

कल्याण डोंबिवली महापालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयातील डॉक्टर आणि परिचारिकांना (नर्स) झालेल्या मारहाणीची घटना आणि त्यानंतर महापालिका प्रशासनाने दाखवलेली कमालीची उदासीनता ही अत्यंत संतापजनक आणि चिंताजनक आहे. सत्ताधारी पक्षाच्या माजी नगरसेवकाकडून शासकीय रुग्णालयात घुसून वैद्यकीय कर्मचाऱ्यांना बेदम मारहाण केली जाते आणि त्याविरुद्ध तातडीने कठोर पावले उचलण्याऐवजी महापालिका आयुक्त मूग गिळून गप्प बसतात, यावरून प्रशासकीय यंत्रणेची संवेदनशीलता किती तळाला गेली आहे हे स्पष्ट होते. याप्रकरणी संबंधित लोकप्रतिनिधीला पोलिसांनी अटक केली असली, तरी या संपूर्ण प्रकरणातील महापालिका आयुक्तांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. ज्या वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी संकटसमयी जनतेची सेवा करायची, तेच जर शासकीय रुग्णालयात सुरक्षित नसतील आणि त्यांच्या पाठीशी उभे राहण्यास प्रशासन नकार देत असेल, तर कर्मचाऱ्यांनी काम कसे करावे, हा मोठा प्रश्न आहे. मारहाण झाल्यानंतर हतबल झालेले डॉक्टर आणि परिचारिका जेव्हा महापालिका आयुक्तांकडे न्याय मागण्यासाठी जातात, तेव्हा त्यांना तब्बल तीन तास दालनाबाहेर ताटकळत उभे राहवे लागणे आणि शेवटी भेट नाकारून अतिरिक्त आयुक्तांकडे पाठवले जाणे, हा केवळ पीडित कर्मचाऱ्यांचा नव्हे तर संपूर्ण वैद्यकीय क्षेत्राचा अपमान आहे. रुग्णालयाचे प्रमुख आणि प्रशासनाचे मुख्य जबाबदार व्यक्ती म्हणून आयुक्तांनी स्वतः पुढाकार घेऊन पोलिसात तक्रार दाखल करणे अपेक्षित होते. मात्र, सीसीटीव्ही फुटेज आणि प्रत्यक्षदर्शींचे पुरावे उपलब्ध असतानाही प्रशासनाने दाखवलेला हा ढिसाळपणा अनेक शंकांना वाव देणारा आहे. राजकीय दबावापोटी हे संवेदनशील प्रकरण दाबण्याचा प्रयत्न आयुक्तांकडून झाला का, असा जो गंभीर आरोप आता विरोधी पक्षांकडून केला जात आहे, त्यात तथ्य वाटण्यासारखीच प्रशासनाची एकूण वाटचाल राहिली आहे. शास्त्रीनगर रुग्णालय हे डोंबिवलीतील एक महत्त्वाचे शासकीय रुग्णालय आहे, परंतु तिथे आवश्यक सोयी-सुविधांचा असलेला प्रचंड अभाव आणि सुरक्षेची नसलेली कोणतीही हमी यामुळे अशा घटना वारंवार घडत आहेत. महापालिकेत अनेक वर्षे प्रशासक राजवट असताना आणि शहरासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी येत असतानाही रुग्णालयांची दुरवस्था का कायम आहे, याचे उत्तर महापालिका प्रमुखांनी देणे गरजेचे आहे. शासकीय कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या अशा जीवघेण्या हल्ल्यांनंतरही जर वरिष्ठ अधिकारी हलगर्जीपणा करणार असतील, तर अशा अधिकाऱ्यांचीही वरिष्ठ पातळीवरून सखोल चौकशी झाली पाहिजे. वैद्यकीय कर्मचाऱ्यांना सुरक्षित वातावरण देणे ही केवळ रुग्णालयाची नव्हे, तर प्रशासनाची घटनात्मक जबाबदारी आहे आणि ती पार पाडण्यात अपयशी ठरणाऱ्या प्रवृत्तींचा निषेध व्हायलाच हवा.

### भावगीत
### आभाळभर तुझी चाहूल

आभाळभर तुझी चाहूल, रिमझिम गाते गाणे,
थेंबाथेंबात तुझेच नाव, प्रेमाचे मधुर तराणे.
ओल्या या मनफुलांना तुझीच ऊब लाभावी,
तुझ्या हसऱ्या सहवासाने माझी दुनिया फुलावी.

ये ना सख्या... ये ना सख्या...
धर पुन्हा माझा हात.
तुझ्याविना या जीवनाला,
नाही कुठली वाट.
रिमझिम... रिमझिम... प्रेम बरसे,
गंध दरवळे, फुले हसे.
तू माझा श्वास, तू माझा ध्यास,
तूच माझा विश्वास.

पहिली सर जेव्हा आली, माती हळवी हसली,
तुझ्या आठवणींची फुले माझ्या अंगणी फुलली.
दवबिंदूच्या आरशामध्ये तुझेच रूप उमलले,
माझ्या प्रत्येक स्वप्नामध्ये तुझेच चांदणे खुलले.

थंड झुळूक अलगद आली, तुझा स्पर्श घेऊन,
मनपाखरू उडत गेले तुझ्या नावाचे गाणे गाऊन.
ढगांच्या त्या कुशीत जणू तुझे हास्य दाटले,
इंद्रधनूच्या प्रत्येक रंगात तुझे प्रेम साठले.

ये ना सख्या... ये ना सख्या...
डोळे तुझीच वाट पाहती.
रिमझिम सरींच्या तालावर,
प्रीतीची वीणा गात राहती.

उंबरठ्यावर दीप लावून तुझीच वाट मी पाहू,
संधिप्रकाशाच्या सावलीत तुझेच गीत मी गाऊ.
घरभर तुझा सुगंध, मनभर तुझे हास्य,
तुझ्या एका भेटीमध्ये माझे सारे सौख्य.

नदी म्हणाली सागराला, प्रेम कधी न थांबे,
वारा म्हणाला फुलांना, सुगंध कधी न थांबे.
तसेच आपल्या प्रीतीचे नाते अढळ राहावे,
काळाच्या प्रत्येक वळणावर नव्याने फुलावे.

ये लवकर रे माझ्या सख्या, सोसवेना ही दुरी,
तुझ्या मिठीत विसावू दे ही विरहाची रात्र सारी.
ऋतू बदलतील, दिवस सरतील, तारेही लोपतील,
पण आपल्या प्रेमाची फुले सदैव उमलत राहतील.

पाऊस पडो, वारा वाहो, चंद्र पुन्हा हसावा,
तुझ्या-माझ्या प्रेमाचा दीप सदैव तेवत राहावा.
आभाळभर तुझी चाहूल, मनभर तुझे नाव,
तूच माझी प्रार्थना, तूच माझ्या जीवनाचा भाव.
रिमझिम सरी... मंद झुळूक...
प्रीतीची अखंड कहाणी...
तू, मी आणि हे आभाळ...
हीच माझी चिरंतन गाणी..

**कवी : पांडुरंग मारुती धुमाळ**

# मोशी कचरा डेपो दुर्घटना : '4 दिवसांपासून 8 जण कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली अडकले'; मोशी दुर्घटनेवर नातेवाईकांचे गंभीर आरोप

**"माझ्या भावाचा मुलगा अक्षय राजू सावंत गेल्या 4 दिवसांपासून येथे अडकून आहे. पहिल्या दिवशी गतीने काम सुरु होतं, पण आता तशा गतीने काम दिसत नाही."**






"4 दिवसांपासून काय परिस्थिती आहे, काही कळायला मार्ग नाही. दिवस वाढत आहेत आणि अडकलेले लोक अजूनपर्यंत बाहेर आलेले नाही. आम्ही काय समजायचं.. आम्ही 4 दिवसांपासून वाट पाहत आहोत."

अक्षयचे काका व्याकुळतेने बोलत होते.

मोशीतील कचरा डेपो परिसरात झालेल्या दुर्घटनेत अडकून पडलेल्या लोकांमध्ये अक्षयही आहे. अक्षयचं 2 महिन्यांपूर्वीच लग्न झालेलं आहे.

सुखी संसाराची स्वप्नं पाहणारी अक्षयची बायको त्याच्या घरी परतण्याची वाट पाहत आहे. अक्षयच्या नातेवाईकांप्रमाणेच इतर अडकलेल्या लोकांचे नातेवाईकही मागील 4 दिवसांपासून या ठिकाणी आपल्या माणसाची वाट पाहत उभे आहेत.

मोशी कचरा डेपोच्या दुर्घटनेला आता 4 दिवस उलटले असून ढिगाऱ्याखाली अडकून पडलेल्या 8 जणांचा अद्याप पत्ता लागलेला नाही.

दुसरीकडे दुर्घटनास्थळाबाहेर नातेवाईक आपल्या माणसाच्या परतण्याच्या आशेसह डोळे लावून बसले आहेत. त्यांच्या डोळ्यातील अश्रू आणि प्रशासनाच्या संथपणाबाबतचा संताप बरंच काही सांगून जातो.

प्रशासनाचं काम संथगतीने सुरू असून बचावकार्य कुठपर्यंत आलं, सद्यस्थिती काय याबाबत प्रशासनाकडून समाधानकारक उत्तर मिळत नसल्याचं नातेवाईकांचं म्हणणं आहे.

प्रशासनाचा ढिसाळ कारभार याला जबाबदार असल्याचा संताप आणि आरोप ढिगाऱ्याबाहेर थांबलेल्या नातेवाईकांनी केलाय.

अडकलेल्यांना लवकरात लवकर सुखरूप बाहेर काढण्याची मागणीही यावेळी नातेवाईकांकडून केली जात आहे.

**नेमकं काय घडलं?**

मागील काही दिवसांमध्ये राज्यातील काही भागांत मुसळधार पाऊस बरसला. अनेक ठिकाणी पूरपरिस्थिती निर्माण होऊन जनजीवन विस्कळीत झाले.

दरम्यान, बुधवारी (8 जुलै) पिंपरी चिंचवड परिसरातील मोशी कचरा डेपो परिसरात ग्राउंड फ्लोअर प्लस 2 मजली (G+2) आरसीसी संरचनेतील कॅन्टीन व कार्यालयाची इमारत पाया खचून कोसळली.

ही घटना दुपारी दीडच्या सुमारास जेवणाच्या वेळेत घडल्याने अनेक कर्मचारी इमारतीच्या ढिगाऱ्याखाली अडकून पडले.

मिळालेल्या माहितीनुसार, यामध्ये अंदाजे 23 नागरिक अडकले होते. घटना घडल्यानंतर सुरुवातीला 5 नागरिक सुखरुप बाहेर पडले. तर, 18 जण अडकून होते.

त्यांना बाहेर काढण्यासाठी तातडीने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एन डी आर एफ), भारतीय सेना दल, महापालिका अग्निशमन दल, पीएमआरडीए अग्निशमन दल आणि पोलीस प्रशासन यांनी संयुक्तरित्या बचावकार्य सुरू केले.

रात्री 8 च्या सुमारास या पथकाने 6 नागरिकांना सुखरुप बाहेर काढले. त्यांना तातडीने उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात हलविण्यात आले.

त्यानंतर रात्री दीड वाजेपर्यंत आणखी 3 नागरिकांना सुखरुप बाहेर काढण्यात आले आणि उपचारार्थ जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले.

सद्यस्थितीत 8 जण अडकून पडले असून त्यांना बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मात्र, हे प्रयत्न पुरेसे नसल्याचं नातेवाईकांचं म्हणणं आहे.

सध्या घटनास्थळी दुर्घटनाग्रस्त इमारतीच्या सभोवतालचा मलबा हटविण्याचे काम सुरू आहे. यासाठी जेसीबी मशीनचा वापर करण्यात येत आहे.

**नातेवाईकांनी काय म्हटलं?**

या दुर्घटनेला 4 दिवस होत आले तरी अद्याप ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांना बाहेर काढण्यात यश का आलेलं नाही, असा प्रश्न नातेवाईकांनी उपस्थित केलाय.

यंत्रणा अपुरी पडत असेल तर ती वाढवण्यात का येत नाही, असाही संतप्त प्रश्न नातेवाईकांनी उपस्थित केलाय.

आम्हाला आत जाऊ दिलं जात नाहीये, काम कुठपर्यंत आलं याबाबत कोणतीही माहिती दिली जात नाहीये, अशी नातेवाईकांची तक्रार आहे.

आतमध्ये फक्त आर्मी आणि पोलीस जात आहेत, पण आम्हाला जाऊ दिलं जात नाहीये. शासानाकडून आम्हाला प्रतिसाद किंवा कुठलंही समाधानकारक उत्तर मिळत नसल्याचं नातेवाईकांचं म्हणणं आहे.

ज्या ठिकाणी लोक अडकून पडले तिथे वेळेवर काम का चालू करण्यात आलं नसल्याचा आरोप नातेवाईकांनी केलाय.

तसेच, बचावकार्यात वापरण्यात येत असलेल्या मशीनरी कमकुवत आणि अपुऱ्या असल्याचंही नातेवाईकांनी म्हटलंय.

आम्ही गेल्या 4 दिवसांपासून प्रतीक्षेत आहोत. पण अद्याप काहीच माहिती मिळालेली नाही. अडकलेल्यांना लवकरात लवकर बाहेर काढण्यासाठी प्रशासनाने आणखी प्रयत्न करावे, आवश्यक यंत्रणा, व्यवस्था वाढवावी, अशी मागणी नातेवाईकांनी केली आहे.

**कंपनीनं काय स्पष्टीकरण दिलं?**

मोशी दुर्घटनेवर ॲनाटॉमी वेस्ट हँडलिंग सेल लिमिटेड कंपनीकडून एक निवेदन जारी करण्यात आलं आहे.

या निवेदनानुसार, ही घटना सतत सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे घडली. प्रकल्पाच्या बाहेरील कचऱ्याचा ढिगारा मुसळधार पावसामुळे अस्थिर झाला आणि तो प्रशासनाच्या इमारतीवर कोसळल्याने ही दुर्घटना घडल्याचं दिसून येतं.

प्रकल्पात घटना घडली तेव्हा नियोजित देखभाल कामासाठी उत्पादन बंद ठेवण्यात आले होते. त्यामुळे त्यावेळी प्रकल्पात मर्यादित कर्मचारी उपस्थित होते.

दुर्घटनेनंतर अग्निशमन दल, एनडीआरएफ, भारतीय लष्कर, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि इतर आपत्कालीन यंत्रणांसह बचावकार्य तातडीने सुरू करण्यात आल्याचं कंपनीने म्हटलं आहे.

जखमींना वैद्यकीय मदत, बचावकार्यात सहकार्य आणि प्रभावित कुटुंबांना आवश्यक ती मदत देण्यास कंपनी कटिबद्ध असल्याचंही निवेदनात नमूद करण्यात आलं आहे.

**प्रशासनाकडून काय सांगण्यात आलं?**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सध्या सुरू असलेल्या बचावकार्याची माहिती दिली.

ते म्हणाले, "ज्या मजल्यावरती हे 8 लोक अडकल्याची माहिती आहे, त्याठिकाणी कचरा काढण्याचं काम सुरू आहे. घटनास्थळी सुरू असलेल्या बचावकार्याच्या प्रत्येक घडामोडीवर आम्ही बारकाईने लक्ष ठेऊन आहोत. बचावकार्यासाठी आवश्यक असलेली सर्व साधनसामग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे. सद्यस्थितीत 12 मशीनरी काम करत असून आम्ही अजून मशीन मागवत आहोत."

"इमारत एका बाजूने झुकली असल्याने आणि इमारतीचे बांधकाम एका बाजूने ढासळले असल्याने अडचणी येत आहेत. एका बाजूचा मलबा हटविल्यानंतर इमारतीचा जो अस्थिर भाग आहे तो स्थिर झाल्यानंतर आतमध्ये जवानांना प्रवेश करण्यासाठी पुरेसा सुरक्षित मार्ग तयार करून आत अडकलेल्या नागरिकांना सुखरुप बाहेर काढण्याची कार्यवाही केली जाईल."

"या बचावकार्यात सहभागी असलेले राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ), भारतीय सेना, महापालिका आणि पीएमआरडीए अग्निशमन दल, पोलीस प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन विभाग यांनी घटनास्थळाची सद्यस्थिती, भौगोलिक परिस्थिती आणि तांत्रिक बाबींचा विचार करून बचावकार्याची योजना बनवली असून अडकलेले नागरिक सुखरुप बाहेर काढले जातील असा विश्वास आहे," असंही त्यांनी नमूद केलं.

या दुर्घटनेला कारणीभूत असणाऱ्यांवर काय कारवाई केली जाईल या प्रश्नाला उत्तर देताना आयुक्त म्हणाले, "हे बचावकार्य संपल्यानंतर याबाबत चौकशी केली जाईल आणि जे कुणी जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल."

या घटनेतील मृतांच्या नातेवाईकांना मदत जाहीर करण्याबाबत आयुक्त म्हणाले, "सध्या बचावकार्य सुरू आहे. कंपनीच्या मॅनेजरशी चर्चा झाली असून नुकसानभरपाई दिली जाईल. तसेच, कर्मचाऱ्यांचा विमाही काढण्यात आलेला आहे. त्यासह महापालिकेमार्फत त्यांना मदत देण्याबाबतही आम्ही महापौर आणि इतर पदाधिकाऱ्यांशी चर्चेनंतर निर्णय घेऊ."

तर, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (एनडीआरएफ) सेकंड कमांड दीपक तिवारी यांनी बचावकार्यातील पुढील मोहिमेबद्दल माहिती दिली.

ते म्हणाले, "दुर्घटनाग्रस्त इमारतीमध्ये बचावकार्यातील जवानांना सुरक्षित व सहजतेने प्रवेश करणे कठीण जात आहे. त्यामुळे इमारतीच्या आजुबाजूला असलेला मलबा हटविण्याचे काम हाती घेण्यात आले आहे."

"याशिवाय, बचावकार्य करताना इमारतीचा धोकादायक भाग अडथळा ठरू नये यासाठी तो हटविण्याचे काम सुरू आहे. इमारतीमध्ये बचावकार्यातील जवानांना सुरक्षितपणे आत प्रवेश करून अडकलेल्या व्यक्तींना सुखरूपपणे बाहेर काढण्यासाठी मोहीम सुरू करण्याचे नियोजन आहे. यातून निश्चितपणे आत अडकलेल्या व्यक्तींपर्यंत पोहोचून त्यांना सुखरूपपणे बाहेर काढण्याचा आमचा उद्देश आहे," असंही ते म्हणाले.

## शिल्लेगावात अवैध धंद्यांवर पोलिसांचा हातोडा; आठ दिवसांत मोठी कारवाई
# नवीन पोलीस निरीक्षकांचा पदभार स्वीकारताच धडाकेबाज मोहीम; वाळू, दारू आणि जुगार अड्ड्यांचे कंबरडे मोडले

**गंगापूर :** छत्रपती संभाजीनगर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अप्पर पोलीस अधीक्षक आणि गंगापूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली शिल्लेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांविरुद्ध अत्यंत तीव्र आणि धडाकेबाज मोहीम राबवण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या आठ दिवसांच्या कालावधीत ही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पोलीस पथकाने केलेल्या या धडक कारवाईमुळे मागील अनेक वर्षांचा रेकॉर्ड मोडीत निघाला असून, गुन्हेगारी प्रवृत्तींवर मोठा अंकुश निर्माण झाला आहे.

या विशेष मोहिमेदरम्यान पोलिसांनी विविध ठिकाणी छापे टाकून दारूबंदी कायद्यांतर्गत अनेक गुन्हे दाखल केले असून, मोठ्या प्रमाणावर मुद्देमाल आणि गावठी दारू जप्त केली आहे. यासोबतच जुगार अड्ड्यांवर यशस्वी छापे टाकून लाखो रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. अमली पदार्थ विरोधी कारवाईत पोलिसांनी अंमली पदार्थ गांजा जप्त केला असून, यामध्ये गांजाची झाडे आणि गोणीत भरलेल्या गांजाचा समावेश आहे. शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटख्याची अवैध विक्री करणाऱ्यांवरही कारवाई करून साठा जप्त करण्यात आला आहे.

सर्वात मोठी कारवाई अवैध वाळू वाहतूक आणि वाळू माफियांच्या विरोधात करण्यात आली आहे. पोलिसांनी अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करून लाखो रुपयांची वाहने आणि मुद्देमाल जप्त केला. तसेच विविध ठिकाणी साठवून ठेवलेली शेकडो ब्रास बेकायदेशीर वाळू जप्त करून ती ताब्यात घेण्यात आली आहे. पोलिसांच्या या सातत्यपूर्ण आणि प्रभावी कारवायांमुळे शिल्लेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अवैध धंद्यांचे कंबरडे मोडले असून कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट झाली आहे. या धडाकेबाज मोहिमेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, शिल्लेगाव व पंचक्रोशीतील नागरिकांकडून पोलीस दलाच्या या सिंघम स्टाईल कामगिरीचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे.

## फर्दापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेला आले तळ्याचे स्वरुप; गुडघाभर पाण्यातून वाट काढताना ग्राहकांचे अतोनात हाल

**पान 1 वरून ->**

करावा लागत असल्याने, पाय घसरून पडण्याची आणि अपघाताची मोठी भीती निर्माण झाली आहे.

**गटार व्यवस्थेचा अभाव आणि प्रशासनाचे दुर्लक्ष :**

गावातील सांडपाणी आणि पावसाचे पाणी वाहून नेण्यासाठी योग्य गटार व्यवस्था नसल्याने ही गंभीर परिस्थिती ओढवली आहे. "शासन आणि प्रशासन झोपेत आहे," अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिक नागरिक देत आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्याती असलेल्या पर्यटन स्थळाशेजारील एका महत्त्वाच्या गावात, जिथे रोज कोट्यवधींची उलाढाल होते, तिथे अशी अवस्था असणे हे स्थानिक ग्रामपंचायत आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे मोठे अपयश मानले जात आहे.

**तातडीने उपाययोजना करण्याची मागणी :**

बँकेसमोरील हे साचलेले पाणी तत्काळ उपसून काढावे आणि या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी पक्क्या गटारींचे बांधकाम करावे, अशी जोरदार मागणी फर्दापूर परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांकडून केली जात आहे. प्रशासनाने वेळीच लक्ष न दिल्यास साचलेल्या पाण्यामुळे डेंग्यू, मलेरिया यांसारख्या साथीच्या आजारांचा धोकाही वाढण्याची शक्यता आहे.

# 100 चा बॉण्ड 120 ला विकणारी लाचखोर बॉण्ड विक्रेती शैला बोऱ्हाडे ACB च्या जाळ्यात! वाळूज MIDC तील कारवाईने खळबळ

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** १०० रुपयांचा जनरल स्टँप बॉण्ड चक्क १२० रुपयांना विकून सर्वसामान्यांची लूट करणाऱ्या एका लाचखोर महिला बॉण्ड विक्रेतीला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने रंगेहात पकडले आहे. शैला शशिकांत बोऱ्हाडे (रा. मीनाताई ठाकरे मार्केट, महाराणा प्रताप चौक, बजाजनगर, वाळूज एमआयडीसी) असे या कारवाईत अटक करण्यात आलेल्या महिला बॉण्ड विक्रेतीचे नाव आहे. आज, १० जुलै रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास वाळूज एमआयडीसीतील महाराणा प्रताप चौकात ही धडक कारवाई करण्यात आली. ७ बॉण्डसाठी एकूण १४० रुपये जास्तीचे घेताच एसीबीच्या पथकाने झडप घातली. याप्रकरणी एसीबीचे पोलीस निरीक्षक अमोल सोनवणे यांच्या तक्रारीवरून वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्यात सायंकाळी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाळूज महानगर परिसरातील एका सामाजिक कार्यकर्तीला त्यांच्या संस्थेच्या नोंदणीसाठी सभासदांचे शपथपत्र तयार करायचे होते. यासाठी त्यांना ७ कोऱ्या बॉण्डची आवश्यकता होती. गुरुवारी (९ जुलै) सायंकाळी पाचच्या सुमारास त्या महाराणा प्रताप चौकातील शैला बोऱ्हाडे यांच्या बॉण्ड विक्री केंद्रावर गेल्या. १०० रुपयांच्या अधिकृत किमतीच्या बॉण्डसाठी शैला बोऱ्हाडे हिने प्रत्येक बॉण्डमागे २० रुपये जास्तीची म्हणजेच एकूण १२० रुपयांची मागणी केली. सर्वसामान्यांची होणारी ही लूट सहन न झाल्याने आणि जास्तीचे पैसे देण्याची इच्छा नसल्याने, या सामाजिक कार्यकर्तीने थेट लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे (ACB) धाव घेऊन तक्रार नोंदवली.

**साडीचा पदर उलटा फिरवला अन 'एसीबी'ने आवळला पिंजरा!**

**सामाजिक कार्यकर्तीच्या तक्रारीची पडताळणी केल्यानंतर, 'एसीबी'च्या पथकाने आज (१० जुलै) सकाळी १० वाजता वाळूज परिसरात सापळा रचला. ठरल्याप्रमाणे सकाळी साडेदहाच्या सुमारास तक्रारदार महिला बॉण्ड घेण्यासाठी गेली. तिने ७ बॉण्डचे जास्तीचे १४० रुपये शैला बोऱ्हाडे हिच्या हातात दिले. पैसे स्वीकारताच तक्रारदार महिलेने पूर्वनियोजित इशारा म्हणून आपल्या साडीचा पदर उलटा खांद्यावर टाकला. हा इशारा मिळताच दबा धरून बसलेल्या एसीबीच्या पथकाने तात्काळ हल्लाबोल करत शैला बोऱ्हाडेला रंगेहात दबोचले. पथकाने जादा वसूल केलेले पैसे, बॉण्ड आणि इतर साहित्य जप्त केले आहे.**

**अन अधिकाऱ्यांनी पतीचा दबाव झिडकारला!**

कारवाई सुरू असतानाच, आरोपी शैला बोऱ्हाडे हिचा पती शशिकांत बोऱ्हाडे याने घटनास्थळी येत स्वतःच्या पदाचा रुबाब दाखवून एसीबीच्या पथकावर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. मात्र, एसीबीच्या अधिकाऱ्यांनी त्याचा हा दबाव अक्षरशः झिडकारून लावला आणि कायदेशीर कारवाई पूर्ण केली. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीच्या केंद्राची झडती घेतली असता तेथे मोठ्या प्रमाणावर जमिनीशी संबंधित संशयास्पद कागदपत्रे आढळून आली आहेत. मात्र, अधिकृत सूत्रांनी याला अद्याप पूर्ण दुजोरा दिलेला नाही. एसीबीच्या पथकाने आरोपी शैला बोऱ्हाडे हिला ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी वाळूज एमआयडीसी पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. या कारवाईमुळे वाळूज आणि बजाजनगर परिसरातील अधिक दराने बॉण्ड आणि तिकिटे विकणाऱ्या इतर दलालांचे धाबे दणाणले असून, या धाडसी कारवाईचे नागरिकांमधून स्वागत होत आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## सिल्लोडमध्ये अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई; ट्रॅक्टर-ट्रॉलीसह 7.56 लाखांचा मुद्देमाल जप्त

**सिल्लोड, दि. 9 :** सिल्लोड शहर पोलिसांनी अवैध गौण खनिज (वाळू) वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर-ट्रॉलीवर कारवाई करून सुमारे 7 लाख 56 हजार 500 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवार (दि. 9) रोजी दुपारी 3.20 वाजण्याच्या सुमारास भराडी रोडवरील हॉटेल अर्जुन परिसरात ही कारवाई करण्यात आली. यामध्ये डोंगरगाव (ता. सिल्लोड) येथील बालू नामदेव बोरेडे तसेच सिल्लोड येथील होरेख जहिर होरेख इब्रेश यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 303(2), 49 तसेच गौण खनिज (खान खनिज) अधिनियम, 1957 मधील संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कारवाईदरम्यान लाल रंगाचा 241 DI मॅसी फर्ग्युसन ट्रॅक्टर (क्र. MH-34-L-6520), ट्रॉली आणि अंदाजे एक ब्रास वाळू असा एकूण 7 लाख 56 हजार 500 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अनधिकृतरित्या वाळूची वाहतूक करून आर्थिक फायदा मिळविण्याच्या उद्देशाने हा प्रकार केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# श्रीराम मंदिर देणगीतील कथित अपहारप्रकरणी हिंगोलीत काँग्रेसचे "रघुपती राघव राजाराम" सत्याग्रह आंदोलन

**हिंगोली :** अयोध्या येथील श्रीराम मंदिर देणगीतील कथित अपहार प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार हिंगोली शहर काँग्रेस, जिल्हा काँग्रेस आणि युवक काँग्रेस कमिटीच्या वतीने शुक्रवार (दि. 10 जुलै) रोजी हिंगोली येथे "रघुपती राघव राजाराम" सत्याग्रह आंदोलन करण्यात आले.




आंदोलनाची सुरुवात शहरातील गांधी चौक परिसरातील घडवाई हनुमान मंदिरात प्रभू हनुमानाचे दर्शन घेऊन करण्यात आली. यावेळी कार्यकर्त्यांनी टाळ-मृदुंगाच्या गजरात "रघुपती राघव राजाराम" या भजनाचे गायन करत प्रभू श्रीरामांच्या नामाचा जयघोष केला. त्यानंतर घडवाई हनुमान मंदिर ते गांधी चौक मार्गे हिंगोली शहर पोलीस ठाण्यापर्यंत पदयात्रा काढण्यात आली.

यानंतर हिंगोली शहर पोलीस निरीक्षक यांना निवेदन देत श्रीराम मंदिर देणगीतील कथित आर्थिक गैरव्यवहाराची निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, "प्रभू श्रीराम हे मर्यादा, न्याय आणि सत्याचे प्रतीक आहेत. त्यांच्या नावाने देशभरातील कोट्यवधी रामभक्तांनी श्रद्धेने दिलेल्या देणगीचा पारदर्शक व उत्तरदायी हिशोब जनतेसमोर येणे आवश्यक आहे. महात्मा गांधींच्या सत्याग्रहाच्या मार्गाने, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतेच्या विचारांनी आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वाभिमानाच्या प्रेरणेने सत्यासाठीचा हा लढा सुरू राहील."

या सत्याग्रह आंदोलनात जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष डॉ. सतीश पाचपुते, माजी जिल्हाध्यक्ष सुरेशआप्पा सराफ, शहर काँग्रेस अध्यक्ष मिलिंद उबाळे, प्रदेश सचिव प्रा. साहेबराव देवकते, माजी जिल्हा परिषद सदस्य प्राचार्य श्यामराव जगताप, युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव बंटी नागरे, दतराव भवर जामठीकर, भीमशक्तीचे हिंगोली युवक जिल्हाध्यक्ष विशाल इंगोले, औंढा तालुका अध्यक्ष ॲड. प्रदीप पोले, सेवादल जिल्हाध्यक्ष सुदामराव खंदारे, बापुराव पाटील वडदकर, बाजीराव इंगोले, जुबेर मामू, एकनाथ शिंदे, अतुल नायक, किसनराव जुमडे, दत्तराव राठोड, विठ्ठल जाधव, हारुण पठाण, विठ्ठल मोहनकर, अनुप नायक, युसूफ पठाण, संजय राठोड, शेख अमन, सुमित शिंदे, त्र्यंबक जगताप यांच्यासह काँग्रेसचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## नशामुक्त आणि बालविवाहमुक्त करण्यासाठी प्रशासनाचे पाऊल

### 13 ते 31 जुलै पर्यंत विशेष जनजागृती मोहीम

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याला नशामुक्त आणि बालविवाहमुक्त करण्यासाठी जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाच्या वतीने एका विशेष जनजागृती पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, दिनांक १३ जुलैपासून या मोहिमेला प्रारंभ होत असून, ती ३१ जुलैपर्यंत संपूर्ण जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.

सामाजिक परिवर्तनाचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून सुरू होणाऱ्या या अभियानात पोलीस, शिक्षण, महिला व बालविकास यांसारखे विविध शासकीय विभाग एकत्र येऊन काम करणार आहेत. या महत्त्वपूर्ण मोहिमेचा भव्य उद्घाटन सोहळा सोमवार, १३ जुलै रोजी सकाळी साडेदहा वाजता बीड बायपास रोडवरील एमआयटी कॉलेजच्या मंथन सभागृहात पार पडणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अविनाश गलांडे यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर समीर राजूरकर हे असतील, तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. उपस्थित राहणार आहेत. या अभियानाला प्रशासकीय बळ देण्यासाठी जिल्ह्यातील अनेक मान्यवर अधिकारी उद्घाटन सोहळ्यास उपस्थित राहणार आहेत. यामध्ये महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अध्यक्ष मिन्नू पी.एम., पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, राज्य उत्पादन शुल्काचे अधीक्षक अभिनव बालुरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, प्रादेशिक उपायुक्त डॉ. दीपक खरात, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, माध्यमिक शिक्षणाधिकारी आश्विनी लाठकर आणि अंमलीपदार्थ विरोधी टास्क फोर्सचे पोलीस उपअधीक्षक साईनाथ ठोंबरे आदींचा समावेश आहे.

जिल्ह्याला व्यसनमुक्त आणि बालविवाहमुक्त करण्यासाठी नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असून, या उद्घाटन कार्यक्रमास आणि मोहिमेस नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा समाजकल्याण अधिकारी बाबासाहेब अरवत, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कोमल कोरे आणि नशामुक्त भारत अभियान जिल्हा समितीचे सदस्य विलास चंदने यांनी केले आहे.

## कन्नड येथे जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी घेतला मतदार यादी पुनरीक्षण कामाचा आढावा; 100 टक्के काम करणाऱ्या बीएलओंचा सत्कार

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी आज कन्नड तालुक्याला भेट देऊन मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कामाचा सविस्तर आढावा घेतला. या दौऱ्यादरम्यान त्यांनी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे कौतुक केले, तसेच विविध विकासकामांची पाहणी करून गरजू लाभार्थ्यांना शासकीय योजनेच्या मंजुरी पत्रांचे वितरणही केले. कन्नड तालुक्यातील मतदार यादी पुनरीक्षणाच्या कामाला गती देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत एका महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, तहसीलदार श्रीमती



सारिका भगत यांच्यासह विविध तालुकास्तरीय अधिकारी उपस्थित होते. या मोहिमेत मतदान केंद्र क्रमांक १८४, ३२५ आणि २७९ येथे अत्यंत उत्कृष्ट काम करून १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांचा (बीएलओ) जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. आपल्या या दौऱ्यात जिल्हाधिकारी गौडा यांनी अंधानेर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन तेथील एसआयआर कामाची सद्यस्थिती जाणून घेतली. शालेय परिसरात त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले, तसेच त्यांनी परिसरातील घनदाट वनालाही भेट दिली. यानंतर त्यांनी मुंडवाडी येथील आदर्श शेतकरी तेजराव बारगळ संचलित 'अंकुर रोपवाटिके'ची पाहणी करून आधुनिक शेतीविषयक उपक्रमांचे कौतुक केले. या दौऱ्याचे औचित्य साधून शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना दिलासा देण्यासाठी संजय गांधी निराधार योजनेची मंजुरी पत्रे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मानपूर्वक वितरित करण्यात आली. दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात जिल्हाधिकारी गौडा यांनी औराळा भागाला भेट दिली. तेथे कार्यरत असलेल्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांशी संवाद साधत त्यांनी मतदार यादी पुनरीक्षणाच्या कामाचा वेग वाढवण्याच्या संदर्भात उपस्थितांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. संपूर्ण तालुक्यात हे काम पारदर्शक आणि अचूकपणे पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी प्रशासनाला दिले.

## नांदेडच्या एका नामांकित कोचिंग क्लासेसच्या संचालकाचीआत्महत्या

**नांदेड:** जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या एका नामांकित कोचिंग क्लासेसच्या संचालकाने आत्महत्या केल्याने खळबळ उडाली आहे. शुक्रवारी पहाटे क्लासेसच्या परिसरातील चिंचेच्या झाडाला संचालकाचा मृतदेह लटकलेल्या अवस्थेत आढळून आला. एन. टी. जाधव अस मृतकाचे नाव आहे. जाधव हे शांत व संयमी व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते, आत्महत्येचे कारण अद्याप अस्पष्ट असून या घटनेने हिमायतनगर व शहरात मात्र हळहळ व्यक्त होत आहे.

एन टी जाधव हे शिक्षक असून हिमायत शहरात खाजगी शिकवणी केंद्र चालवतात. अनेक वर्षांपासून ते शिक्षण क्षेत्रात कार्यरत होते. शांत आणि संयमी अशी त्यांची ओळख आहे. अनेक विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षा तसेच शैक्षणिक क्षेत्रात यश मिळविले होते. आज सकाळच्या सुमारास काही नागरिकांना ट्युशन परिसरातील चिंचेच्या झाडाला जाधव यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आला. त्यानंतर नागरिकांनी याची माहिती तात्काळ हिमायतनगर पोलीसांना दिली.

पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. घटनेची माहिती मिळताच मोठ्या संख्येने नागरिक, माजी विद्यार्थी, पालक आणि परिसरातील प्रतिष्ठित व्यक्तींनी घटनास्थळी गर्दी केली होती. दरम्यान, या आत्महत्ये मागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. घटनास्थळी उपस्थित असलेल्या काही नागरिकांनी भूखंड व्यवहाराशी संबंधित वाद असल्याचा संशय व्यक्त केला आहे. तसेच काही दिवसांपूर्वी त्यांच्या शाळेची मान्यता रद्द झाल्यामुळे ते मानसिक तणावात असल्याचीही चर्चा परिसरात सुरू आहे. मात्र या सर्व बाबींना अद्याप कोणतीही अधिकृत पुष्टी मिळालेली नाही.

## कटकटगेट परिसरातील वारंवार वीज खंडित होण्याच्या समस्येला दिलासा; अशफाक जमील खान यांच्या प्रयत्नांना यश

**छत्रपती संभाजीनगर :** कट कट गेट परिसरात वारंवार वीज गुल होण्याच्या समस्येमुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत होता. अखेर स्थानिक युवा नेते अशफाक जमील खान यांच्या अथक पाठपुराव्यामुळे परिसरात 100 केव्ही क्षमतेची नवीन डीपी (डिस्ट्रिब्युशन ट्रान्सफॉर्मर) टाकण्यात आली असून त्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

परिसरातील वाढती वीज मागणी आणि कमी दाबाच्या समस्येमुळे नवीन डीपीची गरज निर्माण झाली होती. याबाबत अशफाक जमील खान यांनी महावितरणकडे सातत्याने पाठपुरावा करून हा प्रश्न मार्गी लावला. त्यांच्या प्रयत्नांना यश येत



अखेर परिसरात 100 केव्हीची नवीन डीपी टाकण्यात आली.

नवीन डीपी कार्यान्वित झाल्यानंतर कट कट गेट परिसरातील वारंवार वीज खंडित होण्याची समस्या मोठ्या प्रमाणात कमी होईल, तसेच नागरिकांना अधिक सुरळीत वीजपुरवठा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. या कामाबद्दल स्थानिक नागरिकांनी अशफाक जमील खान यांचे आभार मानत त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

यावेळी अशफाक जमील खान म्हणाले, "कट कट गेट परिसरातील नागरिकांना अनेक दिवसांपासून वीज समस्येचा सामना करावा लागत होता. ही समस्या कायमस्वरूपी मार्गी लागावी, यासाठी मी महावितरणकडे सातत्याने पाठपुरावा केला. अखेर 100 केव्हीची नवीन डीपी बसविण्यात आली, याचा आनंद आहे. पुढेही परिसरातील नागरिकांच्या मूलभूत सुविधा आणि जनहिताच्या प्रश्नांसाठी मी नेहमीच तत्पर राहीन. नागरिकांची सेवा हेच माझे कर्तव्य असून त्यांच्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही."

## ज्येष्ठ पत्रकार कृष्णा पाटील यांना पितृशोक

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



**उरण / रायगड :** उलवे नोडमधील मोरावे गावचे ज्येष्ठ नागरिक तथा सामाजिक कार्यकर्ते अर्जुन भोकाजी पाटील यांचे गुरुवारी (ता. ९) हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ७८ वर्षांचे होते. ते ज्येष्ठ पत्रकार कृष्णा पाटील यांचे वडील होत. दिवंगत अर्जुन पाटील यांच्यावर मोरावे येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. या अंत्ययात्रेसाठी परिसरातील शेकडो नागरिक उपस्थित होते.

या अंत्ययात्रेत आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत सहभागी झाले होते आणि त्यांनी अर्जुन पाटील यांना श्रद्धांजली वाहिली. यावेळी बोलताना ते म्हणाले की, अर्जुन पाटील हे सर्वांच्या सुख-दुःखात नेहमी सहभागी असायचे. ते वारकरी संप्रदायाचे पाईक होते आणि त्यांनी आपल्या आयुष्याला भजन-कीर्तनाची जोड दिली होती. त्यामुळे ते शेवटच्या श्वासापर्यंत भक्तीत रमलेले होते. हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे अचानक निधन झाल्यामुळे मोरावे गावातील एक चांगला माणूस काळाच्या पडद्याआड गेला आहे, याचे मला खूप दुःख आहे. कृष्णा पाटील हे माझ्या घरच्या सदस्यासारखेच आहेत, त्यामुळे मी त्यांच्या कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, अशा भावना घरत यांनी व्यक्त केल्या. दिवंगत अर्जुन पाटील यांचा होम विधी शनिवारी (ता. ११) सकाळी ९.३० वाजता मोरावे गावातील 'अर्जुन भवन' येथे करण्यात येणार आहे. तसेच त्यांचा दशक्रिया विधी शनिवार, १८ जुलै २०२६ रोजी लांगेश्वर येथे, तर उत्तरकार्य मंगळवार, २१ जुलै २०२६ रोजी 'अर्जुन भवन', मोरावे येथे करण्यात येणार आहे.

## अनिल अंबानी समूहाच्या कर्ज घोटाळ्याचा तपास वेगात

**मुंबई :** रिलायन्स अनिल अंबानी समूहाशी संबंधित बनावट (शेल) कंपन्यांना राष्ट्रीयीकृत बँकांकडून मोठ्या प्रमाणावर कॉर्पोरेट कर्जे कशी मंजूर करण्यात आली, याचा तपास आता सक्तवसुली संचालनालय करत आहे. 'रिलायन्स होम फायनान्स' आणि 'रिलायन्स कमर्शियल फायनान्स'मधील १५,५४८ कोटी रुपयांच्या कथित अपहार प्रकरणी ईडीने आपल्या तपासाचा वेग वाढवला आहे.

तपासादरम्यान ईडीला 'मेसर्स ई-कॉम्प्लेक्स प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीच्या संचालकाच्या घरी धाड टाकली असता, महत्त्वाचे पुरावे हाती लागले आहेत. हे धागेदोरे रिलायन्स समूहाच्या वरिष्ठ व्यवस्थापनाशी जोडले गेलेले आहेत. विशेष म्हणजे, कागदोपत्री अस्तित्वात असलेल्या या शेल कंपन्यांचे संचालक प्रत्यक्ष रिलायन्सचेच कर्मचारी किंवा निकटवर्तीय होते, जे समूहाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या इशाऱ्यावर काम करत असल्याचे स्पष्ट झाले आहे. या कंपन्यांचे आर्थिक व्यवहार रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, रिलायन्स पॉवर आणि रिलायन्स कॅपिटल या प्रमुख कंपन्यांमधील अधिकारीच हाताळत होते.

सीबीआयने दाखल केलेल्या गुन्ह्यांच्या आधारे ईडीने ही कारवाई सुरू केली असून, आतापर्यंत ४,५१० कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे. यापैकी ३,९२६ कोटी रुपयांच्या जप्तीवर सक्षम प्राधिकरणाने शिक्कामोर्तब केले आहे. या प्रकरणी रिलायन्स कॅपिटलचे माजी संचालक अमिताभ झुनझुनवाला आणि माजी सीएफओ अमित बापना यांना यापूर्वीच अटक करण्यात आली असून, ते सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.बँकिंग क्षेत्रात खळबळ उडवून देणाऱ्या या घोटाळ्यात, रिलायन्सच्या या कंपन्यांनी सार्वजनिक निधी कसा वळवला आणि बँकांच्या नियमांना बगल देऊन कर्जे कशी लाटली, यावर ईडी लक्ष केंद्रित करत आहे.

## डॉ. अण्णा भाऊ साठे संघर्ष सेना राष्ट्रीय अध्यक्षपदी साहेबराव दनके तर राष्ट्रीय प्रदेशाध्यक्षपदी राजू साठे

**सिल्लोड :** सिल्लोड येथे समविचारी विविध क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांची बैठक नुकतीच संपन्न झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी संदीप मानकर यांची उपस्थिती होती तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते डॉ सचिन साबळे, पंडित आव्हाड, विजय् आव्हाड,करण कांबळे, बैठकीमध्ये मातंग समाजाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी सर्व समविचारी विविध मान्यवरांच्या सर्वांमते





मातंग समाजाच्या सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक विकास होण्यासाठी राज्य पातळीवर संघटन तयार करून यामध्ये जास्तीत जास्त नवतरुणांना समाजकार्याची आवड निर्माण करून विकास करण्याचे आवाहन करण्यात आले, सर्व पदाधिकाऱ्यांच्या वतीने डॉ.अण्णाभाऊ साठे संघर्ष सेना महाराष्ट्र राज्य या सामाजिक संघटनेच्या संस्थापक अध्यक्षपदी साहेबराव दनके यांची निवड करण्यात आली. यावेळी नूतन संस्थापक अध्यक्ष साहेबराव दनके प्रदेशाध्यक्षपदी राजू साठे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या बैठकीमध्ये डॉ. सचिन साबळे, यांनी आजची समाजाची स्थिती सुधारण्यासाठी सर्वांनी एकत्रित राहून संघर्ष करणे गरजेचे ही काळाची गरज असल्याचे सांगितले सखोल मार्गदर्शन केले. विशेष म्हणजे हिंदू मातंग समाजाच्या गेली 45 वर्षापासून प्रलंबित असलेल्या सामाजिक विधायक प्रश्नासाठी सदर संघटना ही लोकशाही मार्गाने विविध आंदोलने करतील असा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला आहे.

राज्य पातळीवरील संघटनांमध्ये लवकरच विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती केल्या जाणार असल्याची यावेळी नूतन संस्थापक अध्यक्ष साहेबराव दनके यांनी सांगितले आहे. या बैठकीमध्ये शिवराम कांबळे, लखन साठे ज्ञानेश्वर साठे नारायण साठे त्रिंबक शेजवळ,शुभम आव्हाड, विश्वजीत साबळे, सखाराम भिसे, ओमकार आव्हाड दुर्गादास जाधव, मधुकर साठे ज्ञानेश्वर शेजुळ, भागवत शेजुळ,संजय घोरपडे, गणेश सोनवणे,गणेश दणके, परमेश्वर दणके ,उमेश सोनवणे, समाधान लोखंडे, सुनील शिरसाट, एकनाथ आगाम,बबन दणके ,मनोज दणके, सदानंदन दणके, संदीप शिरसाट बापू आव्हाड भिकन कांबळे , सचिन शेजुळ, विशाल आहेरे फकीरराव सोनवणे, कृष्णा दनके, दिगंबर नाडे, बापू शिरसाठ, सागर दनके,संतोष आगाम, सिल्लोड सोयगाव फुलंब्री अजिंठा येथील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परभणीतील महापौर सय्यद इकबाल यांच्यावर हल्ल्याच्या निषेधार्थ अधिकारी व कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन

हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी:** परभणी शहर महानगरपालिकेचे नवनिर्वाचित महापौर सय्यद इकबाल यांच्या ऑफिसच्या दालनामध्ये गुरुवार दिनांक 9 जुलै रोजी प्राणघातक हल्ल्याचा प्रयत्न हल्लेखोराच्या डाव फसला.

या प्रकरणात एक आरोपीवर नवा मोंढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस अटक केली आहे

या घटनेच्या निषेधार्थ शुक्रवार दिनांक 10 जुलै रोजी अधिकारी कर्मचारी संघटनेच्या वतीने काम बंद आंदोलन करण्यात आले आहे.

कचरा डम्पिंग प्रकरणातकारवाई न झाल्याच्या कारणावरून संशयित इसमाने महापौरांच्या ऑफिसच्या दालनामध्ये गोंधळ घालत परवानगी नसतानाही मोबाईलवर चित्रीकरण सुरू केले त्यांच्यावर प्राण-घातक हल्ला करण्याच्या उद्देशाने अंगावर धाव घेण्याचा प्रयत्न केला यावेळी महापौर चे



स्वीस सहाय्यक रमेश चव्हाण यांना धक्काबुक्की करून त्यांचा चष्मा फोडून सरकारी कामात अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला असा आरोप आहे या घटनेनंतर महापालिकेतील कर्मचाऱ्यांनी सुरक्षा रक्षकाने संशयताला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले चौकशी दरम्यान संशयिताने कार्यालयात येण्यापूर्वी कचऱ्यात चाकू फेकल्याची माहिती समोर आली असून पोलिसांनी तो चाकूही जप्त केला आहे यांप्रकरणी महापौराचे स्वीय सहाय्यक रमेश चव्हाण यांच्या फिर्यादीवरून शेख रफिक शेख रौफ राहणार अली नगर धार रोड परभणी यांच्याविरुद्ध नवा मोंढा पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास नवा मॉडेल पोलीस ठाण्याचे साई पोलिस निरीक्षक शिंदे करत आहेत पोलिसांनी शहरात स्टील कायदा व सुव्यवस्था नियंत्रण असल्याचे स्पष्ट केले असून काम बंद आंदोलनासाठी मोठा पोलीस बंदोबस्त त्यांना आहे अधिकाऱ्यांनी कर्मचारी संघटनेतर्फे शुक्रवारी सकाळी महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारासमोर घटनेच्या निषेधार्थ काम बंद आंदोलन दोषीवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली नगरसेवक विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी आणि कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. महापौर सय्यद इकबाल यांच्या मध्यस्थीनंतर दुपारी काम बंद आंदोलन मागे घेण्यात आले महानगरपालिकेतील लोकप्रतिनिधी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रश्न आला असून अशा घटनांना आळा घालण्यासाठी कडक सुरक्षा उपाययोजनांची अमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# हरवलेल्या व्यक्तींची माहिती देण्याचे आवाहन



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** परभणी शहर कालाबावर येथील अंजुम फातेमा मोहसिन खान, अरहान खान मोहसिन खान तसेच रिदा फातेमा मोहसिन खान हे दि. 06 जुलै, 2026 रोजी सकाळी 07 .00 वाजता कालाबावर येथील राहत्या घरातून निघून गेले असून नंतर घरी परत आले नाहीत.

याप्रकरणी मोहसिन शेरदिल खान यांनी नानलपेठ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या सदरील व्यक्तींचे वर्णन पुढील प्रमाणे आहे. अंजूम फातेमा मोहसिन खान (वय 31 वर्ष), रंग गोरा, केस काळे लांब, डोळे गारुळे, बांधा मजबूत, उंची 5 फुट, शिक्षण 10 वी, भाषा हिंदी अवगत असून अंगात जांभळया रंगाचा बुरखा, पायात चप्पल आहे.

अरहान खान मोहसिन खान (वय 14 वर्ष) रंग गोरा, केस काळे, डोळे काळे, शरीर बांधा सडपातळ, उंची 5 फूट 5 इंच, शिक्षण 08 वी, भाषा हिंदी अवगत असून अंगात काळया रंगाचे टी शर्ट व क्रीम रंगाची पॅन्ट, पायात चप्पल आहे. तसेच रिदा फातेमा मोहसिन खान (वय 09 वर्ष) रंग गोरा, केस काळे व लांब, डोळे गारुळे, भाषा हिंदी, शिक्षण तिसरी, शरीरबांधा सडपातळ, उंची 3 फूट, अंगात लाल रंगाचा स्कट व काळया रंगाची पॅन्ट व पायात चप्पल आहे.

बेपत्ता झालेला सदरील महिला व मुले कुणाला आढळून आल्यास पोलीस निरीक्षक कदम (मो. ९४२३९१०९०२) किंवा तपासीक अंमलदार मुरकुटे ( मो. 8766881682) नानलपेठ पोलिस ठाणे, परभणी यांच्याशी तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# भास्कर आबा दानवे यांच्या वाढदिवसानिमित्त गोसेवा व वृक्षारोपण

## भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा उपक्रम

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**जालना :** भाजप महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या वाढदिवसानिमित्त नगरसेवक अजित मानधानी व कल्याण भदणेकर यांच्या पुढाकाराने गोसेवा आणि वृक्षारोपणाचे समाजोपयोगी उपक्रम उत्साहात पार पडले.

याअंतर्गत हनुमान घाट येथील गोशाळेत महाआरती करण्यात आली. त्यानंतर गायींना हिरवा चारा वाटप करून गोसेवा करण्यात आली. तसेच गायत्रीनगर परिसरातील खुल्या जागेत वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. वाढदिवसाचे औचित्य साधत समाजहित आणि पर्यावरण संरक्षणाचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

या उपक्रमात नगरसेवक कल्याण भदणेकर, विजय कामड, अजित मानधानी, विष्णू डोंगरे, गोवर्धन कोल्हे, कुणाल भदणेकर, हरिभाऊ नाटकर, अमन मित्तल, नागेश अंभोरे, वेदप्रकाश त्रिपाठी, राघवेंद्र त्रिपाठी, दत्तात्रय कोल्हे, आकाश नखलव, महादेव बोटुळे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

यावेळी उपस्थितांनी भास्कर आबा दानवे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या निरोगी, दीर्घायुषी व यशस्वी आयुष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. सामाजिक बांधिलकी जपत गोसेवा व वृक्षारोपणासारख्या उपक्रमांद्वारे वाढदिवस समाजोपयोगी पद्धतीने साजरा करण्यात आला.

# दुचाकी वाहन नोंदणीसाठी नवी मालिका सुरु

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी, दि.10 (जिमाका) :** उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून दुचाकी (एमसीवाय) वाहनांसाठी लवकरच एमएच-22-बीएम ही नवीन मालिका सुरु करण्यात येत आहे. तरी इच्छुक नवीन वाहन खरेदी करणाऱ्या वाहनधारकांनी विहीत नमुन्यात विहित पसंती क्रमांकाच्या शुल्काचा धनादेश (डीडी) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, परभणी यांच्या नावे कार्यालयात दि. 10 ते 13 जुलै 2026 या कालावधीत दुपारी 2.30 पर्यंत खिडकी क्र. 11 सहा. रोखपाल यांच्याकडे जमा करावेत असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केले आहे.

नविन नोंदणी वितरकांच्या स्तरावर होत असल्यामुळे लिलाव दिनांकात व सिरीज सुरु करण्याच्या दिनांकात बदल करण्याचे पूर्ण अधिकार या कार्यालयाकडे राहील. एका पसंती क्रमांकासाठी दोन किंवा अधिक अर्ज प्राप्त झाल्यासच लिलाव घेण्यात येईल. या बाबत सूचना केवळ कार्यालयाच्या सूचना फलकावर लावण्यात येतील, तरी जास्तीत-जास्त वाहनधारकांनी पसंती क्रमांकासाठी अर्ज करावे, असे त्यांनी कळविले आहे.

# 14 वर्षांनंतर सावित्रीबाई फुले भाजी मंडई सुरू होण्याच्या दिशेने लवकरच मिळणार जागा

## नोंदणी प्रक्रियेची स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांची पाहणी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेच्या वतीने संभाजीपेठ येथील सावित्रीबाई फुले भाजी मंडई पुन्हा सुरू करण्याच्या हालचालींना वेग आला असून, पात्र ओटे व गाळेधारकांना लवकरात लवकर जागेचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी दिली.

सुमारे १४ वर्षांनंतर ही भाजी मंडई पुन्हा सुरू होत आहे. त्यासाठी महापालिकेने १ ते ४ जुलै या कालावधीत ओटे व गाळेधारकांकडून गाळे वाटपपत्र, शुल्क भरल्याच्या पावत्या, करारनामा, न्यायालयीन आदेश अथवा प्रलंबित प्रकरणांची कागदपत्रे, आधार कार्ड, पॅन कार्ड आदी आवश्यक कागदपत्रे स्वीकारली होती.

सध्या मालमत्ता विभागामार्फत प्राप्त कागदपत्रांची छाननी सुरू असून पात्र लाभार्थ्यांकडून नियमानुसार शुल्क स्वीकारण्याची प्रक्रिया हाती घेण्यात येत आहे.

स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी शुक्रवारी मालमत्ता विभागाला भेट देऊन नोंदणी प्रक्रियेची पाहणी केली. यावेळी त्यांनी ओटे व गाळेधारकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या तसेच संबंधित अधिकाऱ्यांना प्रक्रिया जलद व पारदर्शक पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

सध्या ओटेधारकांचे ३४ आणि गाळेधारकांचे ३२ अर्जांची कागदपत्रे तपासून अंतिम करण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यानंतर संबंधितांकडून शुल्क स्वीकारून पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती मालमत्ता विभागाने दिली.

सभापती अनिल मकरिये व आयुक्त अमोल येडगे यांच्या निर्देशानुसार लाभार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी शनिवार, ११ जुलै रोजीही मालमत्ता विभागाचे कार्यालय सुरू राहणार आहे. लाभार्थ्यांना अर्ज दाखल करता यावेत यासाठी ही व्यवस्था करण्यात आली असून, सभापती मकरिये यांनी काही लाभार्थ्यांचे अर्ज स्वतः स्वीकारले.

यावेळी उपआयुक्त अपर्णा थेटे, सहायक आयुक्त संजय चामले, मालमत्ता विभागाचे अधिकारी तसेच ओटे व गाळेधारक उपस्थित होते.

# अयोध्येतील कथित गैरव्यवहाराच्या निषेधार्थ शिवसेनेचे रामरक्षा आंदोलन

## किराडपुरा श्रीराम मंदिरात रामरक्षा पठण, घंटानाद व महाआरती; चंद्रकांत खैरे यांची उपस्थिती

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** अयोध्येतील श्रीराम मंदिराशी संबंधित कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या निषेधार्थ शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने शुक्रवारी किराडपुरा येथील श्रीराम मंदिरात रामरक्षा आंदोलन करण्यात आले. यावेळी शिवसैनिक व रामभक्तांनी रामरक्षा, मारुती स्तोत्र आणि हनुमान चालीसाचे सामूहिक पठण करत घंटानाद केला तसेच महाआरतीही करण्यात आली.

या आंदोलनाला शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, उपनेते सुभाष पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. श्रीराम मंदिर उभारणीसाठी देशभरातील रामभक्तांनी दिलेल्या देणग्यांचा कथित अपहार झाल्याचा आरोप करत संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

राज्यभरात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली रामरक्षा आंदोलन सुरू असून विविध राम व हनुमान मंदिरांमध्ये रामरक्षा पठण, घंटानाद, महाआरती तसेच साधुसंतांना निवेदन देऊन निषेध व्यक्त केला जात असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

किराडपुरा येथील आंदोलनात शिवसेना सहसंपर्कप्रमुख विजयराव साळवे, भारतीय कामगार सेनेचे सरचिटणीस प्रभाकर मते पाटील, माजी महापौर सुदाम सोनवणे, शहरप्रमुख बाळासाहेब थोरात, दिग्विजय शेरखाने, हरिभाऊ हिवाळे, ज्ञानेश्वर डांगे, गोपाळ कुलकर्णी, वीरभद्र गादगे, गिरिष चपळगावकर, विष्णू जाधव, प्रमोद ठेंगडे पाटील, हिरालाल सलामपुरे, किशोर कच्छवाह यांच्यासह शिवसेना, युवासेना, महिला आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने रामभक्त उपस्थित होते.

# जिल्हा मध्यवर्ती बँकेचे 13 संचालकाची बिनविरोध निवड

## बोर्डीकर वरपूडकर गोरेगावकर गुट्टे विटेकरांचा मार्ग सुकर तर आमदार नवघरे निवडणूक लढवावी लागणार

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



ना. मेघना बोर्डीकर, आ. रत्नाकर गुट्टे, आ. राजेश विटेकर, सुरेश वरपूडकर, रामप्रसाद बोर्डीकर, सुरेश देशमुख, राजेश गोरेगावकर, भगवान वाघमारे, भावना बोर्डीकर, प्रेरणा वरपूडकर, तुषार दूधाटे, पठाण मेहराज खान

**परभणी:** सर्व जिल्ह्यांमध्ये मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या गाजावाजा होत असतानाच अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी गर्दीच उसळलीहोती त्यातून केवळ 13 जागावर बिनविरोध निवड झाली

अर्ज माघारीच्या याद्या बनवायला त्यामुळेच विलंब झाला की न्यायालयीन प्रक्रियेच्या धसक्याने हे कळायला मार्ग नाही उमेदवाराच्या अंतिम यादी सह दिनांक दहा रोजी चिन्ह वाटप होणारा आठ जागांसाठी 19 जुलैला मतदान होणार आहे

अधिक माहिती अशी की परभणी जिल्हा मध्यवर्ती बँकेसाठी तालुका निहाय सोसायटी मतदारसंघ हिंगोली जिल्ह्यातून औंढा तालुक्यातील राजेश गोरेगावकर व दिग्विजय गोरेगावकर हे पिता पुत्र बिनविरोध निवडून आले आहेत वय वर्ष 24 यांनी बिनविरोध निवडून येऊन कमी वयाच्या संचालक पदाचा मान मिळवला आहे तर परभणीतून माजी आमदार सुरेश वरपूडकर तर जिंतूर मधून माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर सेलू मधून पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर सोनपेठ मधून आ.राजेश विटेकर गंगाखेड मधून आ. रत्नाकर गुट्टे. पालम मधून तुषार दुधाटे पठाण मेराजखान शेर गुल खान संचालक पदावर बिनविरोध निवडझाली आहे. या मतदारसंघांमध्ये हा अद्भुत चमत्कार घडला आहे यातील पालम मतदारसंघात एकमेव उमेदवार असल्याने व औंढा गंगाखेड मध्ये छाननी उमेदवार बाद झाल्याने कुठलाही अडथळा राहिला नव्हता.

कृषी पणन प्रक्रिया मतदार संघात माजी आमदार सुरेश देशमुख यांनी बाजी मारली असून चौघांनी माघार घेतली असून महिला राखीव जागेवर भावना बोर्डीकर व प्रेरणा वरपूडकर या दोन्ही महिला संचालिकांनी बिनविरोध बाजी मारली यामध्ये तब्बल 17 जण आणि माघार घेतली मागास प्रवर्गातून एका जागेसाठी भगवान वाघमारे यांचा एकच अर्ज असल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली ही निवड त्यांची दुसऱ्यांदा झाली आहे या ठिकाणी तब्बल आठ जण आणि माघार घेतली असून न्यायालयीन लढाई आलेल्या एका उमेदवाराने माघार घेतली आहे आठ जागांसाठीच ही निवडणूक प्रक्रिया राबविण्याची वेळ न्यायालयीन प्रकरणी संपली की आणखी कुणाची बाकी आहेत हेही अजून गुलदस्त्यातच आहे. सेवा सोसायटीच्या दोन जिल्ह्यातील पाच मतदारसंघात लढत होणार असून रमेश शिंदे तर वसमत मधून आमदार चंद्रकांत नवघरे व तुषार जाधव न्यायालयीन लढा देऊन रिंगणात आले आहेत मानवत मधून आकाश चौकट व अमोल कदम तर पूर्णा येथून नंदकुमार डाखोरे व तुळशीराम बोबडे यांच्यात सरळ सरळ लढत आहे.

इतर शेती मतदारसंघात 17 उमेदवारांच्या माघारी नंतर आ. सईद खान ,विजय जामकर,विजय मोरे सय्यद हरसान व प्रीती जाधव असे पाच उमेदवार रिंगणात उरले आहेत अशीच अवस्था अनुसूचित जाती जमाती मतदारसंघाचे असून प्रशास ठाकूर अतुल सरोदे संजय सारणीकर रिंगणात असून चार जणांनी माघार घेतली आहे विमुक्त जाती व भटक्या जमाती विमुक्त मागास प्रभाग मतदारसंघातही 11 जणांच्या माघारी नंतर स्वराज सिंह परिहार, अभय कुंडगीर,

# जायकवाडी धरणात पाण्याची जोरदार आवक; जलसाठा 31 टक्क्यांच्या पार

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**पैठण :** नाथसागर म्हणजेच जायकवाडी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात होत असलेल्या संततधार पावसामुळे धरणातील पाण्याच्या पातळीत आता मोठी आणि समाधानकारक वाढ होऊ लागली आहे. आज, १० जुलै २०२६ रोजी सकाळी ठीक ६.०० वाजता प्रशासनाकडून मिळालेल्या अधिकृत अहवालानुसार, धरणाचा जिवंत जलसाठा आता ३१.२८ टक्क्यांवर पोहोचला असून धरणाची एकूण पाणी पातळी १५०६.३१ फुटांवर नोंदवली गेली आहे. नाशिक आणि नगर जिल्ह्यातील धरण क्षेत्रांमध्ये झालेल्या जोरदार पावसामुळे जायकवाडी धरणात सध्या २० हजार ६१३ क्युसेक या वेगाने पाण्याची नवीन आवक सुरू आहे. पाण्याच्या या प्रचंड आवकीमुळे धरणाच्या पाणी पातळीत आगामी काळात अधिक झपाट्याने वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या वाढत्या जलसाठ्यामुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्याच्या पिण्याच्या पाण्याचा आणि शेतीचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर सुटण्यास मदत होणार असल्याने नागरिकांमध्ये आणि शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे. दरम्यान, धरणात येणारा पाण्याचा प्रवाह पाहता जलसंपदा विभागाने आणि स्थानिक प्रशासनाने नदीकाठच्या गावांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. आगामी काही दिवसांत पाणलोट क्षेत्रातील पाऊस असाच सुरू राहिल्यास धरणाच्या साठ्यात कमालीची वाढ पाहायला मिळू शकते, असा अंदाजही वर्तवला जात आहे.

# इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळांतर्गत विविध कर्ज योजनांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

हिंदू प्रकाश वार्ता,प्रतिनिधी

**परभणी :** महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ मर्या., जिल्हा कार्यालय परभणी अंतर्गत मुख्य महामंडळासह १३ उपमहामंडळांच्या माध्यमातून लघुउद्योग, व्यवसाय तसेच शिक्षणासाठी विविध कर्ज योजना राबविण्यात येत आहेत. सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी विविध योजनांचे उद्दिष्ट प्राप्त झाले असून पात्र लाभार्थ्यांनी अर्ज करून योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

जिल्हा कार्यालयांतर्गत महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळासह जगतज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ, संत सेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळ, संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळ, स्व. विष्णुपंत रामचंद्र दादरे लोणारी आर्थिक विकास महामंडळ, संत श्री रूपलाल महाराज आर्थिक विकास महामंडळ, लेवा पाटीदार समाज आर्थिक विकास महामंडळ, सरदार वल्लभभाई पटेल गुजर समाज आर्थिक विकास महामंडळ, संत भोजनिंग काका सुतार समाज आर्थिक विकास महामंडळ, आगरी समाज आर्थिक विकास महामंडळ, श्री संत नामदेव महाराज शिंपी समाज आर्थिक विकास महामंडळ, सोळा कुलस्वामिनी आर्थिक विकास महामंडळ, संत श्री संताजी महाराज आर्थिक विकास महामंडळ व संत काशिबा गुख युवा आर्थिक विकास महामंडळ यांचा समावेश आहे.

या महामंडळांमार्फत थेट कर्ज योजना (रु. १ लाख), २० टक्के बीज भांडवल योजना (रु. ५ लाख), वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (रु. १५ लाख), शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना (रु. २० लाख), गट कर्ज व्याज परतावा योजना (रु. ५० लाख) तसेच महिला स्वयंसिद्धी व्याज परतावा योजना राबविण्यात येत असून लाभार्थ्यांनी संबंधित योजनेसाठी अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. योजनांबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ मर्या., जिल्हा कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जायकवाडी वसाहत, कारेगाव रोड, परभणी येथे प्रत्यक्ष संपर्क साधावा किंवा दूरध्वनी क्रमांक ०२४५२-२२७६१५ वर संपर्क साधावा, असेही जिल्हा व्यवस्थापक जे. झेड. राठोड यांनी कळविले आहे.

# राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजनेअंतर्गत पात्र साहित्यिक व कलावंतांनी अर्ज करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषद प्रशासनाने केले आहे. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना कला व साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल दरमहा पाच हजार रुपयांचे मानधन दिले जाते.

या योजनेसाठी अर्जदाराचे वय ५० वर्षांपेक्षा अधिक असणे आवश्यक असून दिव्यांगांसाठी वयोमर्यादेत १० वर्षांची सवलत देण्यात आली आहे. म्हणजेच दिव्यांग अर्जदारांसाठी किमान वय ४० वर्षे आहे. कला किंवा साहित्य क्षेत्रात किमान १५ वर्षांचे योगदान असणे, सातत्यपूर्ण व दर्जेदार कार्य केलेले असणे, तसेच ज्येष्ठ, विधवा, परित्यक्ता आणि दिव्यांग कलाकारांना प्राधान्य दिले जाणार आहे.

अर्जदाराच्या कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न ६० हजार रुपयांपेक्षा जास्त नसावे. तसेच ज्यांची उपजीविका केवळ कलेवर अवलंबून आहे किंवा पूर्वी कलेवर अवलंबून होती, मात्र सध्या अन्य कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही, अशा कलाकारांनाही या योजनेचा लाभ मिळू शकतो. केंद्र किंवा राज्य शासनाच्या नियमित मासिक पेन्शन योजनेचा लाभ घेणारे या योजनेसाठी पात्र ठरणार नाहीत. अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असणे अनिवार्य आहे.

पात्र लाभार्थ्यांनी १ जुलै ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत ऑनलाइन अर्ज करावेत. पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर या योजनेची व्यापक प्रसिद्धी करून जास्तीत जास्त पात्र साहित्यिक व कलावंतांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रहार ढोकणे यांनी केले आहे.

# डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील विश्वासाचा सर्वात महत्त्वाचा दुवा म्हणजे परिचारिका - डॉ. शिवाजी सुक्रे

## महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना (शासनमान्य) घाटी शाखेचा प्रथम वर्धापनदिन उत्साहात; गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील विश्वासाचा सर्वात महत्त्वाचा दुवा म्हणजे परिचारिका. रुग्णांच्या सेवेसाठी चोवीस तास तत्पर राहणाऱ्या सिस्टर आणि ब्रदर यांचे रुग्णांशी भावनिक नाते निर्माण होते. त्यामुळे आरोग्यसेवा अधिक प्रभावी आणि संवेदनशील बनते. परिचारिकांच्या कामाला गती मिळावी यासाठी प्रशासन नेहमीच आवश्यक सुविधा उपलब्ध करून देत असून, घाटीतील महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना (शासनमान्य) प्रत्येक वेळी प्रशासनाच्या पाठीशी ठामपणे उभी राहिली आहे. विविध आंदोलनांच्या काळातही संघटनेने सहकार्याची भूमिका घेतल्याचा अभिमान असल्याचे प्रतिपादन घाटी रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी केले.



महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना (शासनमान्य) घाटी शाखेचा प्रथम वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. सामाजिक बांधिलकी जपत या निमित्ताने जीवनस्पर्श फाउंडेशनमधील गरजू व निराधार विद्यार्थ्यांना शालेय साहित्य किटचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे होते.

यावेळी उपअधिष्ठाता डॉ. गायत्री तडवळकर, डॉ. भारत सोनवणे, डॉ. सुरेश हरबडे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुचिता जोशी, प्रशासकीय अधिकारी दिलीप गोधने, प्राचार्य पालवे, अधिसेविका संजीवनी गायकवाड, संघटनेचे राज्य उपाध्यक्ष भीमा चक्रे, राज्य सरचिटणीस सुमित्रा तोटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्य किटचे वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व, शिस्त, परिश्रम आणि सामाजिक जबाबदारी याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संघटनेच्या अध्यक्षा द्रौपदी कर्डिले, सचिव महेंद्र सावळे तसेच सर्व पदाधिकारी व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्या निकुंभ आणि भाग्यश्री शेप यांनी केले, तर आभार प्रदर्शन शेख मुस्लिम यांनी केले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911